# घटक २ (अ) : अर्वाचीन कविता

## आम्ही कोण? — केशवसुत

अनुक्रमणिका


**२.० उद्दिष्टे**

**२.१ प्रास्ताविक**

**२.२ शब्दार्थ आणि टीपा**

**२.३ कवितेचे अध्ययन**

२.३.१ कविक्रीडा म्हणजे काय?
२.३.२ कविदृष्टी वेगळी कशी?
२.३.३ कवी—अलौकिक सृष्टीचा निर्माता
२.३.४ कविप्रतिभेचे कार्य
२.३.५ कवीला या सृष्टीतून वगळाल काय?

**२.४ नमुना उत्तरे**

**२.५ अधिक अध्ययन**

२.५.१ केशवसुतांचा परिचय
२.५.२ कविमहिमा सांगणारी कविता
२.५.३ वि. स. खांडेकर म्हणतात
२.५.४ केशवकुमारांची विडंबनपर कविता
२.५.५ सुनीत : रचना प्रकार
२.५.६ केशवसुतांचे काव्योद्‌गार

**२.६ सारांश**

**२.७ सरावासाठी स्वाध्याय**

**२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके**

## २.० उद्दिष्टे

तुम्ही यापूर्वी तुकारामांचे अभंग अभ्यासिलेत. आता 'आम्ही कोण?' ही केशवसुतांची कविता अभ्यासणार आहात. तुकारामाची कविता ही ईश्वरभक्ताची कविता आहे. पारलौकिक कल्याण हे तिचे अंतिम उद्दिष्ट आहे. केशवसुत हे ईहनिष्ठ – म्हणजे या लोकातील जीवनावर निष्ठा ठेवणारे कवी आहेत. 'कवी' या मनुष्यजातीसंबंधी त्यांचा उत्कट अभिमान आहे. 'आम्ही कोण' ही कविता अभ्यासा, म्हणजे तुम्हाला–

(१) कवी म्हणजे कोण हे समजेल
(२) कवीचे सामर्थ्य किती मोठे असते, हे ध्यानी येईल
(३) कवीच्या प्रतिभेचे रूप कळून येईल
(४) कवीच्या जीवनाचा हेतू कोणता ते लक्षात येईल
(५) कवी नसतील तर आपले जिणे काय किंमतीचे होईल, त्याची कल्पना येईल

## २.१ प्रास्ताविक

कवी म्हणजे 'ट' ला 'ट' आणि 'री'ला 'री' जुळवणारा कोणी प्राणी हा समज पार चुकीचा आहे. कवी जीवनाची नवी घडी जुळवतो. जीवनाला एक नवे सौंदर्य मिळवून देतो. कवीला 'शब्दसृष्टीचे ईश्वर' असे रामदासस्वामींनी म्हटले आहे आणि ही शब्दसृष्टी म्हणजे एक वेगळी स्वतंत्र सृष्टीच असते. कसे ते आपण केशवसुतांच्या 'आम्ही कोण' या कवितेत पाहू–

## २.२ शब्दार्थ, आणि टीपा

**प्रतिभाबले –** प्रतिभा कवीची किंवा कलावंताची नवीन निर्मिती करणारी कल्पनाशक्ती. 'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमा प्रज्ञा' असेच प्रतिभेचे लक्षण सांगितले आहे. पूर्वी नव्हती अशी गोष्ट निर्माण करण्याची मनाची, बुद्धीची शक्ती म्हणजे प्रतिभा. प्रतिभाबले म्हणजे या प्रतिभेच्या बळाने.

**विचरतो –** (विचरणे) हिंडतो, फिरतो.

**लीलया –** सहजतेने

**दिक्काल –** (दिक् + काल) दिशा आणि काळ; अवकाश आणि काळ. दिशा कोठे सुरू होते व कोठे संपते; काळ कोठे सुरू होतो आणि संपतो; हे कोणासच सांगता येत नाही. त्यांना 'आदी' म्हणजे प्रारंभ नसतो; त्यांना 'अंत' म्हणजे शेवट नसतो. 'दिक्काल' हे अनादी-अनंत असतात.

**बडिवार –** दिमाख, डौल, वैभव

**पाणिस्पर्श –** पाणी = हात; हाताचा स्पर्श

**सौंदर्यातिशय –** सौंदर्याचा अतिशय; पराकोटीचे सौंदर्य

**करांमाजी –** कर म्हणजे हात. करांमाजी म्हणजे हातांमध्ये

**सत्त्व –** (सत् + त्व) – सारभूत अंश, मूळ तत्त्वांश

**निके –** पूर्ण, सर्व, केवळ, विशुद्ध

**सुर –** देव

**सुरलोकसाम्य –** (सुर + लोक + साम्य) = देवांच्या लोकाशी साम्य. स्वर्गाशी सारखेपणा, स्वर्गाबरोबरची सुंदरता

**सुधा –** अमृत

**शरण्य –** शरण जेथे जावे असे, शरण जाण्यास योग्य, जे संरक्षण देऊ शकतात, अभय देऊ शकतात तेच 'शरण्य' होत. ज्यांच्यापुढे शरण जायचे ते संरक्षक देवतेसारखे हवेत.

**गतप्रभ –** (गत + प्रभा) गेलेली आहे प्रभा म्हणजे तेज ज्याचे; निस्तेज.

**तारांगणे –** (तारा + अंगण) – नक्षत्रमंडळ.

**जिणे कवडीमोलावरी विकले जाणे –** पूर्वी कवडी ही नाणे म्हणून वापरली जात असे. एका रुपयाचे ६४ पैसे आणि एका पैशाच्या ६ कवडया. म्हणजे १ कवडी = १/३८४ रुपया. इतकी कमी मोलाची, किंमतीची वस्तू म्हणजे कवडी. जिणे म्हणजे आयुष्य. आपले आयुष्य हे आपणांस सर्वाधिक मोलाचे असते. त्याचीच कवडीइतकी क्षुद्र किंमत होणे म्हणजे 'कवडीमोलावरी जिणे विकणे' होय!

## २.३ कवितेचे अध्ययन

केशवसुतांची 'आम्ही कोण?' ही कविता वाचा.

**"आम्ही कोण?"**

(शार्दूलविक्रीडित)
आम्ही कोण म्हणूनि काय पुससी? आम्ही असू लाडके –
देवाचे, दिधले असे जग तयें आम्हांस खेळावया;
विश्वी या प्रतिभाबले विचरतो चोहीकडे लीलया,
दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके!
सारेही बडिवार येथिल पहा! आम्हांपुढे ते फिके;
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया–
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या;
फोले पाखडिता तुम्ही, निवडितो ते सत्त्व आम्ही निके!

शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरे?
पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोणते?
ते आम्हीच, सुधा कृतींमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे;
ते आम्हीच शरण्य, मंगल तुम्हां ज्यांपासुनी लाभते!
आम्हांला वगळा–गतप्रभ झणी होतील ताराङ्गणे;
आम्हांला वगळा–विकेल कवडीमोलावरी हे जिणे!

आता 'आम्ही कोण?' या कवितेचा तुम्हास सूक्ष्म अभ्यास करायचा आहे. त्यासाठी या कवितेचे चरण चार भागात विभागले आहेत. या प्रत्येक विभागाचा प्रथम तुम्ही स्वतंत्र अभ्यास करा. या प्रत्येक विभागाच्या शेवटी प्रश्न दिले आहेत, त्यांची उत्तरे लिहा. नंतर दिलेल्या नमुना-उत्तरांशी तुमची उत्तरे पडताळून पाहा.

आता चरण १ ते ३ हा भाग शांतपणे, मनन करीत वाचा. मनातल्या मनात वाचा. एकेक शब्दातून व्यक्त होणारा अर्थ नीट जाणून घ्या–

आम्ही कोण म्हणून काय पुससी?– आम्ही असूं लाडके –
देवाचे. दिधले असे जग तये आम्हांस खेळावया;
विश्वी, या प्रतिभाबले विचरतो चोहींकडे लीलया,

### २.३.१ कविक्रीडा म्हणजे काय?

येथे कवी कोणाला तरी प्रत्युत्तर देत आहे. 'तुम्ही कोण?' म्हणून कोणीतरी अधिक्षेपाने कवीला विचारले असावे, कवी केशवसुत उलट विचारतात, "आम्ही कोण म्हणून पुसण्याचे कारण काय?" आणि पुढे सांगतात की "आम्ही देवाचे लाडके आहोत; इतके लाडके आहोत की देवाने हे सगळे जग आम्हांला खेळण्यासाठी दिले आहे." घरात आई-वडील आपल्या लाडक्या बाळाला वात्सल्याने सगळे घर खेळायला देतात तसे! हे जग देवाचे आहे. कवी देवाचे लाडके बाळ आहे. देवाने मग या लाडक्या बाळाला सारे जग खेळण्यासाठी देऊन टाकले आहे. याचा अर्थ जगात कोठेही कवी जाऊ शकतो; संचार करू शकतो. त्याला अटकाव नाही. तो जाऊ शकतो कसा? प्रतिभाबले. प्रतिभेच्या बळावर. आपल्या कल्पनाशक्तीच्या सामर्थ्यावर तो कोठेही जाऊ शकतो. चोहीकडे आणि अगदी सहज. प्रतिभेचे वर्णन असेही केले आहे– 'It is the speed with which intellegane goes.' या जगातच नव्हे, तर अखिल विश्वात कवी विहार करीत असतो. कविप्रतिभेचा हा विहार म्हणजे कविक्रीडा होय.

### २.३.२ कविदृष्टी वेगळी कशी?

**'आता चरण ४ वाचा आणि मनन करा'**

दिक्कालातुनि आरपार अमुची दृष्टि पहाया शके!

कवीची दृष्टी आपल्यासारखी दिक् आणि काल यांनी बंदिस्त झालेली नसते. आपणांस दिशा आणि काल यांचे बंधन असते. आपण कोठल्यातरी स्थळी, कोणत्या तरी वेळी, तेथे आणि तेव्हा जखडलेले असतो. त्या स्थळीच्या व वेळाच्या पलीकडे आपण नसतो, जाऊ शकत नाही. कवीची दृष्टी दिक्कालाच्या आरपार जाते; त्या पलीकडचे पाहू शकते. दिक् आणि काल अनादी-अनंत आहेत. कवी

अनादी-अनंताच्या पलीकडचे पाहू शकतो. प्रतिभाचक्षू हे दिव्य चक्षू असतात. या चक्षूंना सूर्याला जे दिसत नाही ते दिसू शकते. 'जे न देखे रवी । ते देखे कवी'.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**(क) एका वाक्यात उत्तर द्या**

(१) तुम्ही कोण आहात असे कोणी विचारले असावे?

..........................................................................................................................................

(२) कवी स्वतःला देवाचे लाडके असे का म्हणतो?

..........................................................................................................................................

(३) कवी कशाच्या बळावर विश्वात चोहोंकडे विहार करतो?

..........................................................................................................................................

(४) कवीच्या दृष्टीला कोणताही अडसर का नसतो?

..........................................................................................................................................

**आता चरण ५ ते ८ वाचा आणि मनन करा.**

सारेहि बडिवार येथिल पहा! आम्हांपुढे ते फिके,
पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया—
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजि या,
फोले पाखडिता तुम्ही, निवडितो ते सत्त्व आम्ही निके!

## २.३.३ कवी — अलौकिक सृष्टीचा निर्माता

कवीला या वास्तवातील, या लौकिकातील गोष्टी मोलाच्या वाटत नाहीत. ज्या गोष्टी आपणाला वैभवाच्या, दिमाखाच्या डामडौलाच्या वाटतात— (कवीने यास 'बडिवार' हा शब्द वापरला आहे—) त्या कवीला सामान्य वाटतात. ते 'फिक्या' वाटतात. त्यात तेज नाही; खरी क्रान्ती नाही. आपले सारे 'बडिवार' कवीपुढे फिके, निस्तेज होऊन जातात. कारण—?

**कवी आपल्या सृष्टीहून अधिक सुंदर, सौंदर्याचा अतिशय असेल अशी स्वतःची वेगळी सृष्टी निर्माण करू शकतो. कवीच्या हाताच्या स्पर्शाने— करांगुलिस्पर्शाने हे घडते. ही जादू कवीच्या हस्तस्पर्शामध्ये असते. हा हस्तस्पर्श म्हणजे कवीचा प्रतिभास्पर्श होय. साधा ओबड-धोबड, कलाहीन धोंडा; पण कलावंताला, मूर्तिकाराला त्यामध्ये 'मूर्ती' दिसते व त्याच्या हातातील छिन्नी त्या धोंड्यातून सुंदर मूर्ती निर्माण करते. अपूर्व वस्तू पाहण्याची व निर्माण करण्याची शक्ती— म्हणजे प्रतिभाशक्ती— त्या मूर्तिकारामध्ये होती, त्यामुळे त्याच्या करस्पर्शाने दगडातून देवमूर्ती प्रकट होते.**

**'पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया—
सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादू करांमाजिया '**

**हे असे खरे असते. साध्या रेषांतून आणि रंगातून चित्रकार अमर चित्रे निर्माण करतो. साध्या स्वरांतून गायक स्वरावली अशी निर्माण करतो की ऐकणाराचे भान हरपते.**

**जादूने मांजराचे कुत्रे करता येते. नसलेले पदार्थ निर्माण करता येतात. पण हे सारे क्षणभंगुर असते; दृष्टिभ्रम असतो हा. कवीच्या जादूने जे निर्माण होते, नवे प्रकटते ते अक्षर असते; अप्रतिम सुंदर असते.**

**वास्तवात गुरफटलेले आणि वास्तवाला अंतिम सत्य मानणारे आपण वास्तवाच उराशी कवटाळून बसतो. कवी या 'वास्तवा'ला 'फोलकट' मानतो. हे 'फोलकट' टाकून देऊन आतील जे 'निकेसत्त्व' आहे, ते तो निवडून घेतो. हे 'निके सत्त्व' अमर असते; अक्षय असते.फूल सुंदर असते. पण ते सकाळी आहे; तर संध्याकाळी नाही. ते मिटते, सुकते आणि गळून पडते; मातीमोल होते. पण फुलाची जेव्हा कविकल्पना सृष्टीत 'फुलराणी' होते आणि 'सूर्य-किरणा'शी तिचे जेव्हा लग्न लागते— तेव्हा ती फुलराणी आणि तिचा तो विवाहसोहळा, हा कायमचा जिवंत राहणारा असतो; त्याला मरण नसते. हे 'सत्त्व' कवी निवडून घेतो. तो 'फूल' घेत नाही. तर 'फूलपण म्हणजे काय' ते ओळखतो व त्या अमरत्वाचे गीत गातो. बालकवींची 'फुलराणी' ही कविता आता दोन-तीनदा शांतपणे मनातल्या मनात वाचा आणि
'फोले पाखडता तुम्ही, निवडितो ते सत्त्व आम्ही निके'**

म्हणजे काय ते अनुभवा. कवीला फूल दिसते, दगड दिसतो, पण तो पाहतो ते फुलात फुलराणी आणि दगडात देवमूर्ती!

'धोंड्यामधुनी दिसते कवीला'

असे केशवसुतांनी म्हटलेच आहे. केशवसुतांना या लौकिक जगाला 'गद्य' जग असे म्हटले आहे, आणि या गद्य जगाला त्यांनी कधीच मान दिला नाही. तुच्छ लेखिले आहे.

(ख) सर्वसामान्य माणसापेक्षा कवीचे वेगळेपण कोणत्या स्वरूपाचे आहे?

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

(ग) 'आम्ही कोण?' मधील 'आम्ही' शब्दामागे कोणता अर्थ कवीला अभिप्रेत आहे?

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

## २.३.४ कविप्रतिभेचे कार्य

'शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरे ?
पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोण ते?
ते आम्हीच; सुधा कृतींमधुनिया ज्यांच्या सदा पाझरे;
ते आम्हीच शरण्य, मंगल तुम्हा ज्यांपासूनी लाभते!

हे विश्व परमेश्वराने निर्माण केले आहे, असे आपण म्हणतो. पण परमेश्वर ही कल्पना कोणी निमाण केली? देवकल्पना मानवी मन, बुद्धी, श्रद्धा, भावना यातूनच जन्माला आली आहे. देवांचा लोक मग मानवी मनाने वेगळी कल्पिला. देवलोक, मानवलोक असे लोक मानले जाऊ लागले. देवांची वसती स्वर्गामध्ये आणि मानव या पृथ्वीवर! स्वर्ग म्हणजे सर्वसुख, ऐश्वर्य, भोग यांचे प्रतीक मानण्यात आले. मुळात काय होते? शून्य! पण या शून्यामध्ये देवांच्या वसाहती वसविण्याचे काम कविप्रतिभेने केले. 'देव' नावाचा एक आदर्श कल्पिला आणि त्या आदर्श पुरुषाच्या स्वर्ग-नामक आदर्श-लोकाची स्थापना केली. म्हणून केशवसुत म्हणतात–

'शून्यामाजि वसाहती वसविल्या कोणी सुरांच्या बरे ?'

पृथ्वी ही गरीब आहे. ती श्रीमंत, ऐश्वर्यसंपन्न व्हायला हवी आहे. पृथ्वीला सुरलोकासारखे – देवलोकासारखे– स्वर्गासारखे केले पाहिजे. हे करण्यासाठी कोण झटत असतात? आम्हीच! म्हणजे कवी–कलावंत!!

केशवसुतांच्या अनेक कवितात पृथ्वी आणि स्वर्ग यांच्या मिलनाच्या आकांक्षेची कल्पना तुम्हांस पाहचला मिळेल. पूर्वी स्वर्ग आणि पृथ्वी जवळजवळ होती. त्यांच्यामध्ये प्रेमभाव होता. प्रीती होती. पण दुष्ट मानवाने त्यांच्यामध्ये वितुष्ट आणले आणि स्वर्ग रागावून, रुसून दूर गेला, तो गेलाच! अशी एक कल्पनाही केशवसुतांनी 'स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य' या कवितेत मांडली आहे. 'सतारीचे बोल' या पुढील कडवे पाहा–

प्रेमरसाचे मधुर बोल ते
वाद्य लागता बोलायाते;
भुललो देखुनि सकलही सुंदर
सुरांगना तो नाचति भूवर;
स्वर्ग धरेला चुंबायाला
खाली लवला – मजला गमला!
अशा वितरती अत्यानंदा
ध्वनि ते – दिड दा, दिड दा, दिड दा!

तेव्हा 'तुम्ही कोण?' या प्रश्नाला 'ते आम्हीच' असे ठणकावून सांगत 'आम्ही' म्हणजे कोण-काय ते केशवसुत एकेका ओळीत, चरणात सांगत गेले आहेत.

आपल्या कृतींतून अमृत पाझरत असते असे केशवसुत म्हणतात. अमृत म्हणजे जे प्राशन केले असता मरण येत नाही; माणूस अमर होतो. लौकिकातील सारे अमंगल दूर करण्यासाठी कविप्रतिमा झटत असते. काव्याला अमृत म्हणण्याचा प्रघात आहेच. केशवसुत सांगतात की या पृथ्वीवर ज्यांना शरण जावे असे कोण म्हणून विचाराल, तर 'ते आम्हीच शरण्य' असे त्याला आमचे उत्तर आहे. तुम्ही

देवाला शरण जाता. पण एक ध्यानी घ्या की 'देव' ही आमच्या प्रतिभेची निर्मिती आहे.

आमच्यापासून तुम्हांस सदैव मंगलच लाभते. तुमचे कल्याण होईल, असेच आमच्या हातून होत असते. 'काव्य हे अमंगल दूर करणारे असते' हे पूर्वीही म्हटले गेले आहे. काव्य हे सत्त्वगुणाचा उत्कर्ष करणारे असते, हे केशवसुतांनी अन्यत्रही सांगितले आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(घ) उत्तरे द्या :

१. सुरांच्या वसाहती म्हणजे काय?
२. पृथ्वीला स्वर्गासारखे करावे यासाठी कोण झटते?
३. 'आम्हीच शरण आहोत' असे केशवसुत का म्हणतात?

| |
|---|
| १ |
| २ |
| ३ |

(ङ) कविप्रतिभेचे कार्य कोणते?

.......................................................................................................................

.......................................................................................................................

## २.३.५ कवीला या सृष्टीतून वगळाल काय?

**आता चरण १३ व १४ वाचा आणि मनन करा**

आम्हांला वगळा – गतप्रभ झणीं होतील तारांगणे
आम्हांला वगळा – विकेल कवडी मोलावरी हे जिणे!

तारा चमचमतो. तो तेजस्वी असतो. सुंदर असतो. जे जे सुंदर आणि तेजःपुंज ते ते येथे अभिप्रेत आहे. तारा हे त्याचे प्रतीक होय. तारांगण म्हणजे सौंदर्य आणि तेज यांची राशी. कवी किंवा कलावंत यांना जीवनातून वगळणे म्हणजे सौंदर्यदृष्टीला वगळणे; तेजाची पूजा करण्याचा मनोभाव नष्ट करणे. 'आम्हांला वगळा' असे जेव्हा कवी म्हणतो, तेव्हा त्यास असे स्पष्टपणे सांगायचे आहे की, तुम्ही तुमच्या जीवनातून सौंदर्यदृष्टी आणि तेजःपूजन वगळा आणि मग काय राहते ते पाहा! सारा अंधार, सारे कुरूप तेवढे उरते. कवी आणि कलावंत म्हणजे सौंदर्यदर्शन आणि तेजःपूजन घडविणारी शक्ती. ही शक्ती जर नष्ट झाली तर आयुष्याला अर्थच उरत नाही. कवडीकिंमतीचे हे आयुष्य ठरते. कवडी कशी दिसते? तिला तेज नाही. थिजलेली, गोठलेली, निःसत्त्व, निर्जीव अशी ती दिसते. बटबटीत आणि ढोबळ. तारा कसा दिसतो? आपल्या अंतस्तेजाने चमचमणारा आणि सुंदर! जिवंत, चैतन्यमय!! कवी आणि कलावंत हे प्रतिक्षणाला नावीन्य पाहणारे व दर्शविणारे, निर्माण करणारे प्रतिभावंत असतात. त्यांना वगळले तर जीवनातले सौंदर्य व चैतन्यच नष्ट होते. जीवन क्षुद्र बनते. कवी-कलावंत कोण आहेत हे सांगून, ते नसतील तर तुमचे काय होईल, हे सांगून केशवसुत आपले उत्तर संपवतात.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(च) १. तारा कशाचे प्रतीक आहे? २. कवडी कशाचे प्रतीक आहे?

.......................................................................................................................

(छ) कवी-कलावंताला सृष्टीतून वगळले तर काय होईल?

.......................................................................................................................

## २.४ नमुना उत्तरे

(क) १. जुन्या कवितेच्या अभिमान्याने किंवा अर्वाचीन कवितेच्या निंदकाने.
२. देवाने सगळे जग त्याला खेळायला दिले आहे म्हणून...

३. प्रतिभेच्या बळावर

४. दिक् आणि काल यांचा अडसर नसतो, कवीची दृष्टी ते सर्व भेदून जाते.

(ख) कवी 'फोलकट' टाकून देऊन 'निकेसत्त्व' निवडतो. कवीला फुलात फुलराणी आणि दगडात देवमूर्ती दिसते.

(ग) 'आम्ही' म्हणजे कवी—कलावंत असा व्यापक अर्थ

(घ) १. स्वर्गलोक, देवलोक इत्यादी

२. प्रतिभावंत कवी-कलावंत

३. आमच्यामुळे जगाचे कल्याण होते.

(ङ) अमंगलाचा नाश करते. पृथ्वीवर स्वर्ग आणते.
चिरंतन आनंदाचा ठेवा शब्दबद्ध करते.
अनुभवाला सुंदर रूप देते.

(च) १. सौंदर्य आणि तेज

२. निस्तेज आणि बेढबपणा

(छ) जीवनातले तेज, चैतन्य आणि सौंदर्य लोपेल

## २.५ अधिक अध्ययन

### २.५.१ केशवसुतांचा परिचय

केशवसुतांच्या आधीची मराठी कविता ही संतकवींची आणि पंडितकवींची कविता होती. शाहिरांची कविता होती. संतकाव्यात अध्यात्म, ईश्वरभक्ती. नीतीचा उपदेश स्वानुभवातून मांडला जात असे. पंडितांनी आपल्या कवितेतून देवकथा आणि संतचरित्रे आख्यानरूपांनी गायली, तर शाहिरांनी ऐतिहासिक वीरपुरुषांची आणि घटनांची चित्रे आपल्या पोवाड्यातून काढली; इष्काचा रंग लावण्यातून आपल्यापुढे ठेवला व केशवसुतांपासून मराठी कविता अंतर्बाह्य बदलली. इंग्रजी कवितेच्या अभ्यासाने कवितेकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. कवितेचा आशय बदलला, अभिव्यक्तीचे स्वरूप बदलले, शैलीची नवी रूपे पुढे आली. केशवसुतांची कविता म्हणजे मराठी कवितेचा नवा अवतार होता. केशवसुतांना अर्वाचीन मराठी कवितेचे जनक असेच मानण्यात येते.

केशवसुत – कृष्णाजी केशव दामले. (इ.स. १८६६–१९०५). केशवसुतांची कविता ही आत्मनिष्ठ कविता आहे. आपल्या जीवनातले अनुभव आपणांस कसे जाणवतात, हे कवी आपल्या कवितेतून सांगतात. केशवसुतांच्या कवितेत वैयक्तिक सुखदुःखांचा आविष्कार आहे, तसेच सामाजिक जाणिवांचाही आविष्कार आहे. निसर्गाचे प्रेम आहे, त्याचबरोबर जीव-जगत् आणि ईश्वर यांच्यातील नाते शोधण्याची तळमळ आहे. ही कविता अक्षरगणवृत्तात्मक रचनेतून बाहेर पडत गेलेली दिसते. क्वचित निर्यमकही ती झाली आहे. कवी आत्मपर वृत्तीचा असला तरी आत्मपरतेतून सर्व मानवविषयक तो बोलत असतो, याचा प्रत्यय केशवसुतांच्या कवितेतून आपणास येतो. त्यांची 'तुतारी', 'स्फूर्ती', 'म्हातारी', 'झपूर्झा', 'हरपले श्रेय', 'सतारीचे बोल' या आणि यासारख्या भावकविता अक्षर काव्यकृती ठरल्या आहेत.

### २.५.२ कविमहिमा सांगणारी कविता

'आम्ही कोण?' ही कविमहिमा सांगणारी कविता आहे. खरे तर, ती केवळ कविमहिमा न सांगता कवी आणि कलावंत यांचा महिमा सांगणारी कविता आहे – गायक, चित्रकार, मूर्तिकार, नर्तक, यांचीही ती कविता आहे. प्रतिक्षणाला नवसौंदर्याचा प्रत्यय आणून देणाऱ्या, नवनिर्मिती करणाऱ्या सर्वांचा महिमा गाणारी ही कविता आहे. ही केशवसुत म्हणजे कृष्णाजी केशव दामले नावाच्या कोण एका व्यक्तीचे मोठेपण गाणारी, अहंकाराने मातलेली कविता नाही. येथे 'आम्ही' म्हणजे कृष्णाजी केशव दामले ही व्यक्ती नसून 'आम्ही' म्हणजे कलाजगत निर्माण करणारे कलावंत, असा अर्थ अभिप्रेत आहे. प्रारंभी ही कविता केशवसुत या व्यक्तीची स्वतः संबंधीची कविता आहे, असे मानले गेले आणि नको तशी टीका झाली. कोणाला ही कविता म्हणजे 'आत्मश्लाघेचा कळस' वाटला; तर कोणाला 'एक मानसिक विकलतेचा किंवा विकृतीचा प्रकार' वाटला. कोणाला येथे 'अचाट अत्युक्ती' जाणवली. पण ही कविता म्हणजे केशवसुतांच्या व्यक्तिगत भावनेचा आविष्कार नाही. त्यामुळे तीमध्ये अहंकाराचा वारा नाही की रोगटपणाचे लक्षण नाही. कलावंताच्या आत्मसामर्थ्याचा निकोप आणि दणकट उद्गार म्हणून या कवितेकडे पाहावे लागेल. कुसुमावती देशपांडे यांनी तशी पाहिली आणि या कवितेतील आशय अखिल कलाविश्वाशी जोडून दिला. पृथ्वीला सुरलोकसाम्य देऊ झटणाऱ्यांमध्ये केवळ कवी

आणि कलावंतच तेवढे येतात असे नाही, तर शास्त्रज्ञही येतात हयाची केशवसुतांना जाणीव आहे. या तिघांच्याही ठायी कल्पनाशक्ती असते आणि या कल्पनाशक्तीच्या, प्रतिभेच्या बळावर हे तिघेही नवसृष्टी निर्माण करू झटतात; गरीब पृथ्वीला स्वर्गाचे वैभव मिळावे यासाठी श्रमतात. 'कल्पकता' नावाची केशवसुतांची एक कविता आहे. या कवितेच्या प्रारंभी केशवसुतांनी एक गद्य टीप दिलेली आहे, ती तुम्ही पाहा. 'कल्पकता' ही एक देवी आहे, असे कल्पून केशवसुतांनी ही कविता रचली आहे. गद्यटीप अशी–

''....सर्व जग आपल्या आहारनिद्रादी ठरीव व्यवसायात निमग्न असता (कल्पकता– देवी) एकांतात बसून भारत-रामायणासारखी काव्ये लिहिते. शाकुंतल, हॅम्लेट, यासारखी नाटके रचते, गुरुत्वाकर्षणासारखे गहन शास्त्रीय सिद्धान्त सुचविते आणि एडिसनच्या फोनोग्राफसारखी यंत्रे तयार करते. तेणे करून नवीन आयु:क्रम पृथ्वीवर सुरू होतो आणि स्वर्ग पृथ्वीला जवळ होतो.''

ही कविता १७ फेब्रुवारी १८९१ मधली, म्हणजे जवळजवळ शंभर वर्षापूर्वीची आहे; पण त्यातील विचार आज घटकेचा आहे आणि निरंतर भविष्याचाही आहे.

## २.५.३ वि. स. खांडेकर म्हणतात–

या संदर्भात थोर लेखक आणि विचारवंत वि. स. खांडेकर यांचा अभिप्राय तुम्ही पाहा. भाऊसाहेब खांडेकर म्हणतात–

''हजारो लोकांतून एखादाच प्रतिभावंत निर्माण होतो. जीवनाची, अनुभवांची आणि सुखदु:खांच्या कल्पनांची रूढ झालेली कुंपणे ओलांडून तो पलीकडे जाण्याचा प्रयत्न करतो. त्याच्या या धडपडीमुळेच नवनिर्मिती घडून येते. काव्यापासून विज्ञानपर्यंत हा नवनिर्मितीचा संचार सदैव सुरू असतो. तिच्यामुळेच मानवी जीवन नवीन सुंदर रूप धारण करू शकते. त्याचा केवळ कायापालट होत नाही; त्याचे अंतरंगही आमूलाग्र बदलते. नवी ध्येये, नवे शोध, नवी स्वप्ने, नव्या आकांक्षा, नवा आनंद यामुळे मानवाचा पुनर्जन्म होतो. ''ते आम्हीच, शरण्य मंगल तुम्हा ज्यांपासुनी लाभते' आणि 'आम्हांला वगळा– विकेल कवडीमोलावरी हे जिणे' असे 'आम्ही कोण?' मध्ये हे प्रतिभावंत म्हणतात, याचे कारण केशवसुतांना प्रतिभेच्या विविध आविष्कारांचा आणि तिच्या अमर्याद सामर्थ्याचा झालेला साक्षात्कार, हेच आहे. 'आम्ही कोण' ही कविता केवळ काव्यविषयक मानण्याची रूढी पडल्यामुळे तिच्यातील वरील ओळींवर दर्पोक्तीचा आरोप करण्याची पद्धत पडत गेली. पण केशवसुतांनी ही कविता आत्मसमर्थन किंवा आत्मगौरव यापैकी कोणत्याही हेतूने लिहिलेली नाही. नव्या कवींची कैफियत म्हणूनही ती स्फुरलेली नाही. वैयक्तिक सुखदु:खापलीकडे ज्यांची दृष्टी जात नाही, वर्तमानापेक्षा दुसरा काळ ज्यांना कळत नाही आणि शरीराखेरीज ज्यांच्या पूजेला अन्य दैवत लाभत नाही, अशा माणसांचा मानवी जीवनाचे सौंदर्य, सामर्थ्य आणि साधुत्व वाढविण्याला कधीच हातभार लागत नाही. ती प्रगती प्रतिभावंताकडूनच होऊ शकते. मग ती प्रतिभा स्वराज्याचे स्वप्न पाहणाऱ्या शिवाजीची असो, निग्रोंची गुलामगिरी नाहीशी करणाऱ्या लिंकनची असो, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हा मंत्र आपल्या देशबांधवांना देणाऱ्या लोकमान्य टिळकांची असो, नाना प्रकारचे शोध लावून जगाच्या सुखात भर घालणाऱ्या एडिसन-मार्कोनीसारख्या संशोधकांची असो अथवा कालिदास-शेक्सपिअरसारख्या महाकवींची असो! हे सारे लोक जितके आत्मनिष्ठ तितकेच ध्येयवेडे असतात. नवनिर्मितीच्या नादात ते अष्टौप्रहर गुंग राहतात. म्हणून जग त्यांची वेडयात गणना करते. कारण जगाला फक्त भूतकाळीचे कर्तृत्व कळते. भविष्यकाळ हा भूतकाळाहून उज्ज्वल असू शकतो, हे त्याला पटू शकत नाही. पण प्रतिभावंतांची दृष्टी भविष्याच्या गर्भातील सोनेरी स्वप्नांवर खिळलेली असते!

– वि. स. खांडेकर
(**'केशवसुत काव्य आणि कला'** – १९५६ प्रस्तावना. पृ. ३१–३३)

स्वत:ला जे उगीचच कवी मानतात अशा कविबुवांची तरफदारी करणारी 'आम्ही कोण?' ही कविता नाही, हे आता तुमच्या लक्षात आलेच आहे. ही सर्व क्षेत्रातल्या कल्पनाशक्तीचा गौरव करणारी आहे. खोटया, नकली कवींचा यथेच्छ समाचार विनोदी पद्धतीने राम गणेश गडकरी यांनी 'कवींचा कारखाना' या आपल्या दीर्घ लेखात मागेच घेतला आहे. आचार्य अत्रे यांनीही अशा कवींची एका विडंबन कवितेत हजेरी घेतली आहे. 'आम्ही कोण?' या केशवसुतांच्या गंभीर, महत्वपूर्ण आणि ओजस्वी गीताची विडंबरूपाने नव रचना करून खोटे कवी कसे असतात ते आचार्य अत्रे यांनी कसे दाखविले ते पाहा– ती कविता अशी–

## २.५.४ केशवकुमारांची विडंबनपर कविता — 'आम्ही कोण?'

'आम्ही कोण?' म्हणून काय पुसता दाताड वेंगाडुनी?
'फोटो' मासिक पुस्तकात न तुम्ही का आमुचा पाहिला?
किंवा गुच्छ, तरंग, अंजलि कसा अद्यापी ना वाचिला?
चाले ज्यावरती अखंड स्तुतिचा वर्षाव पत्रांतुनि
ते आम्ही — परवाङ्मयातिल करू चोरून भाषांतरे
ते आम्ही — न कुणास देउ अगदी याचा सुगावा परी!
डोळ्यांदेखत घालुनी दरवडा आम्ही कुबेराघरी!
त्याचे वाग्धन वापरून लपवू ही आमुची लक्तरे!
काव्याची भरगच्च घेउनि सदा काखोटिला पोतडी
दावू गाउनि आमुच्याच कविता आम्हीच रस्त्यामधे
दोस्तांचे घर बैसवून करू या आम्ही तयांचा 'उदे'
दुष्मानावर एकजात तुटुनी की लोंबवू चामडी

आम्हांला वगळा — गतप्रभ झणी होतील साप्ताहिके!
आम्हांला वगळा — खलास सगळी होतील ना मासिके

मूळ कवितेच्या रचनेचे व शब्दकलेचे सादृश्य येथे राखिले आहे आणि तथाकथित कवींची प्रसिद्धीची अनावर हौस, वाङ्मयचौर्याचा मोह आणि बढाईखोरी, यावर मार्मिक टीका केली आहे. आचार्य अत्रे 'केशवकुमार' या नावाने कविता करीत, हेही 'केशवसुत' या संदर्भात लक्षणीय आहे.

## २.५.५ 'सुनीत' : रचनाप्रकार

आता या कवितेची रचना आपण पाहू. शार्दूलविक्रीडित या वृत्तामधील तीन श्लोक आणि नंतर दोन ओळींचा तातला एक बंध अशी १४ ओळींची ही रचना आहे. एक तर ही तीन श्लोकांची अथवा चार श्लोकांची रचना होणे हे रूढीस धरून झाले असते. येथे ही रचना अशी ३।। श्लोकांची म्हणजे अर्धवट वाटते. पण हा प्रकार पाश्चात्य काव्यातला आहे. याला 'सुनीत' असे म्हणतात. सुनीत हे १४ ओळींचे असते. केशवसुतांच्या पहिल्या सुनीताचे नाव 'मयूरासन आणि ताजमहाल'!

इंग्रजी कवितेत 'सॉनेट' हा काव्यप्रकार आहे. इंग्रजी काव्याच्या परिशीलनामुळे मराठीत 'सुनीत' आले. 'सुनीत' हा ध्वनिसाम्य असलेला शब्द माधवराव पटवर्धन आणि श्री. द.ल. गोखले यांनी सुचवला.

सुनीत म्हणजे जे योग्य प्रकारे नेले गेले ते. विशिष्ट वृत्तबंधातून जीवनानुभव व्यक्त केला आहे. सामान्यतः 'शार्दूलविक्रीडित' हे वृत्त योजले जाते.

एकूण ओळी सोळा
आठ व सहा अशा ओळी किंवा
चार ओळींची तीन कडवी व दोन ओळी

'सुनीत' किंवा सॉनेटचा जन्म इटालीत झाला. 'सॉनेट्टो'च्या मुळाशी वाद्य वाजवणे हा अर्थ आहे.
सुनीतचे मुख्य प्रकार दोन—

अ) शेक्सपियरी सुनीत — बारा ओळींचा पहिला भाग आणि दोन ओळींचा दुसरा भाग. एक-तीन, दोन-चार, पाच-सात, सहा—आठ, नऊ-अकरा, दहा-बारा, तेरा-चौदा अशी साधारण यमक योजना.

बारा व दोन ओळींच्या विभागांचा संबंध विषय व कलाटणी, विचार प्रतिपादन व परमोत्कर्ष भावविस्तार — समारोप किंवा चमत्कृतिजनक शेवट असा असतो.

'आम्ही कोण?' हे सुनीत शेक्सपियरी सुनीत

ब) मिल्टनी सुनीत – आठ ओळींचा एक व सहा ओळींचा दुसरा भाग. दोन्ही भाग स्वतंत्र व स्वयंपूर्ण, पण दोन्ही मिळून एक संपूर्ण सलग रचना

पहिल्या अष्टकात काव्याशय व दुसऱ्या षटकात त्याची परिणती वा उत्कर्ष.
दोन भागांचा संबंध विरोधाचा, विरोधाभासाचा, विरोधपरिहाराचा असतो.
अष्टकात दोनपेक्षा यमके नसावीत.

'आम्ही कोण?' या सुनीतातील यमक रचना पाहा. पहिल्या दोन कडव्यांमध्ये १-४ आणि २-३ अशा चरणांची यमक-जुळणी आहे. तर तिसऱ्या कडव्यामध्ये १-३ आणि २-४ अशा चरणांची यमक जुळणी आहे. तसेच येथील चरण हे स्वतःपुरते अर्थदृष्टचा पूर्ण आहेतच असे नाही; ते पुढील चरणात पुरे होतात– त्यामुळे ओळी तुटल्यासारख्या वाटतात. उदा. पहिल्याच दोन ओळी पाहा.

आम्ही कोण म्हणून काय पुससी? – आम्ही असू लाडके–
देवाचे, ......

तसेच दुसऱ्या कडव्यातील दुसरी-तिसरी ओळ पाहा.

पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया–
सौंदर्यातिशया,.......

अशा ओळींना 'धावत्या ओळी' (Running Lines) म्हणतात. केशवसुतांनी कवितारचनेत सुनीताबरोबर अशा धावत्या ओळीही आणल्या.

या कवितेसंबंधी प्रा. रा. श्री. जोगांचा अभिप्राय पाहण्यासारखा आहे. "अर्थगौरव, रचनासौष्ठव आणि समुचित शब्दयोजना, ह्या तीनही बाबीत केशवसुतांची इतकी चांगली कविता एखादी दुसरीच असेल." केशवसुत नेमके आणि मोजके शब्दच योजतात; अनावश्यक असे शब्द येथे आलेले दिसणार नाहीत. या शब्दांना एक प्रकारचा वेग आहे असे जाणवते आणि ते ठाशीवपणे, भरीवपणे, आवेगाने एका पुढे एक येतात, असेही जाणवते. अधिक्षेपक समोर उभा आहे आणि केशवसुत त्याला रोखठोक उत्तर देत आहेत. असे त्वेषपूर्ण नाटच ही कविता वाचताना अनुभवास येते. 'आम्ही कोण?' याला 'हे आम्ही', 'असे आम्ही' 'ते आम्हीच' असे सांगत सांगत 'तुम्ही कोण?' हेही येथे केशवसुत सांगून जातात. 'फोले पाखडणारे तुम्ही' आणि 'निकेसत्त्व निवडून घेणारे आम्ही', आम्ही 'देवाचे लाडके' ('तुमचे नसलो म्हणून काय झाले?' - ध्वन्यर्थ). 'आम्हीच शरण्य'... ('तुम्ही शरण यायचे असेल तर आम्हांलाच शरण या' हा ध्वन्यर्थ), "आम्हीच तुमच्या या पृथ्वीला स्वर्गीय सौंदर्य आणि ऐश्वर्य मिळवून देणारे आहोत. आम्हांला वगळून तर पाहा.. कवडी मोलापरी तुमचे जिणे विकले जाईल!" एक विलक्षण नाटच या कवितेत भरून राहिले आहे. एकजिनसी, हा पूर्णोद्‌गार आहे.

केशवसुतांना कवीचा-कलावंतांचा, प्रतिभावंतांचा अवमान-अपमान-अधिक्षेप झाल्याचे सहन होत नाही. ते अशावेळी तुटून पडतात. ही भाषा उद्दाम नाही. जुने जीर्ण, निःसत्त्व झालेले जग पद्यपंक्तीच्या तरफेने उलटून टाकण्याचा आत्मविश्वास असणाऱ्या प्रतिभावंतांची ही भाषा आहे. 'माणसाचा उद्धार माणूसच करणार' हा केशवसुतांचा मूलमंत्र आहे.

"प्राप्तकाल हा विशाल भूधर,
सुंदर लेणी तयात खोदा,
निजनामे त्यावरती नोंदा"

असे केशवसुत सांगतात. "आमचे वेद आम्ही लिहू; आमचे ऋषी आम्ही होऊ," हा त्यांचा विश्वास आहे. अशा द्रष्टचा क्रांतिकारक कवीची "आम्ही कोण?" ही आत्मोद्‌गारी कविता आहे आणि हा आत्मोद्‌गार केवळ एका केशवसुतांचा नाही तर नवनिर्माण करणाऱ्या साऱ्या प्रतिभावंतांच्या जातीचा आहे. हा आत्मोद्‌गार अहंमन्यतेचा नसून प्रतिभावंतांच्या सात्विक अहंकाराचा आहे!

## २.५.६ केशवसुतांचे काव्योद्‌गार

केशवसुतांच्या कवितेतील काही ओळी, काही उद्‌गार तुम्ही तुलनेसाठी, केशवसुतांचे नीट आकलन व्हावे, म्हणून पाहा–

१. "देव दानवां नरे निर्मिले
हे मत लोकां कवळू द्या"
('स्फूर्ति')

२. 'नरेच केला हीन किती नर'

('तुतारी')

३. अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
आहात मोठे? पुसतो तुम्हांला?

(आम्ही कोण?)

(येथे धावत्या ओळी आहेत; अधिक्षेपकाला हडसून खडकून विचारले आहे.)

४. माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनिया, चालावयाचा पुढे
आहे सुंदर तो सदा सरसवाङ्‌निष्यन्द चोहींकडे!
तुम्ही नाहि तरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी!
कोणीही पुसणार नाहि, 'कवि तो होता कसा आननी?'

('दुर्मुखलेला')

(वर्गात एका शिक्षकाने 'दुर्मुखलेला' म्हटले त्यावरून केशवसुतांच्या मनात ज्या भावना, जे विचार आले ते वरील कवितेत मांडलेले आहेत.)

केशवसुतांचा हा दुर्दम्य आत्मविश्वास पाहून भवभूती या श्रेष्ठ संस्कृत नाटककाराची आठवण होते. त्याच्या नाटचकृतींची अवहेलना होत असावी तेव्हा त्याने टीकाखोरांना असेच ताडकन् उत्तर दिले होते– "हा माझा प्रयत्न तुमच्यासाठी नाहीच. काळ निरवधी आहे; पृथ्वी विपुल आहे. उद्या कोणी समानधर्म जन्माला येईल आणि तो माझी ही नाटचकृती डोक्यावर घेऊन नाचेल!" प्रतिभावंतांच्या अहंकाराची जात वेगळी असते, हे नीट समजून घ्या.

## २.६ सारांश

अधिक्षेपकाला तुम्ही कोण? या आव्हानात्मक प्रश्नाला उद्देशून केशवसुत एकूण कविजातीसंबंधी, प्रतिभावंतांच्या जातीसंबंधीच त्वेषाने, आत्मविश्वासाने जे प्रत्युत्तर देतात ते म्हणजे 'ही आत्मोद्‌गारी कविता' होय! केशवसुत म्हणतात, आम्ही तुमचे नसलो तरी देवाचे लाडके आहोत. त्याने सर्व जग आम्हांला खेळण्यासाठी दिले आहे. आम्ही प्रतिभेच्या बळावर सर्वत्र हिंडतो. दिक्कालाच्या आरपार आम्ही पाहू शकतो. ज्याला आम्ही हात लावू त्याचे सौंदर्य शिगेला पोहोचते. अशी आमच्या हाताची जादू आहे. तुम्ही फोलकटे निवडता, आम्ही निकेसत्त्व निवडतो. या पृथ्वीला स्वर्गाचे सौंदर्य व ऐश्वर्य लाभावे म्हणून झटणारे तुम्ही नाहीत; ते आम्हीच आहोत. आमच्या कृतींमधून अमृत पाझरते. आम्हाला शरण या कारण ज्याला शरण जावे असे आम्हीच आहोत. देवाला तुम्ही शरण जाता; पण ध्यानात घ्या, देवांच्या वसाहती कोणी निर्माण केल्या? आम्हीच. तेव्हा आमच्यामुळे तुम्हा सर्वांचे कल्याण होणार आहे. आम्हांला वगळून जग पाहाल तर जीवनाचे सारे सौंदर्य, सारे तेज लोपून जाईल आणि कवडीकिंमतीचे तुम्ही व्हाल!"

कविमाहात्म्य इतक्या ठाशीवपणे आत्मतेजाने उत्स्फूर्त गाणारी ही कविता अनुपम आहे!

## २.७ सरावासाठी स्वाध्याय

(१) पुढील पद्यपंक्तीतील आशयाचा विस्तार करा

१. दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टि पहाया शके!
२. पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूप्रती द्यावया–
सौंदर्यातिशया...
३. पृथ्वीला सुरलोकसाम्य झटती आणावया कोणते?
४. आम्हांला वगळा – गतप्रभ झणी होतील तारांगणे.

(२) 'कविमहिमा' या विषयावर लहानसा निबंध लिहा.
(३) 'आम्ही कोण?' या कवितेचे रसग्रहण करा.
(४) केशवसुत आणि केशवकुमार यांच्या 'आम्ही कोण?' या कवितांची तुलना करा.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) केशवसुतांच्या काव्यविषयक खालील कविता वाचा व त्यातील विचार जाणून घ्या.
   १. सृष्टी , तत्त्व आणि दिव्यदृष्टी
   २. कल्पकता
   ३. धूमकेतू आणि महाकवी
   ४. क्षणात नाहीसे होणारे दिव्य भास।।
   ५. शब्दांनो! मागुते या

(२) **पासंग** -- कुसुमावती देशपांडे!
   ('आम्ही कोण?' या कवितेबद्दलची पृष्ठे ६४ ते ७४)

(३) **केशवसुतांची काव्यदृष्टी** -- प्रा. दि. के. बेडेकर

(४) **समग्र केशवसुत** -- संपादक : भ. श्री. पंडित

(५) **केशवसुत** -- प्रा. रा. श्री. जोग